पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. २२ दिनांक २९/०३/२०२३

# महाराष्ट्र पोलीस शिपाई भरती - २०२१ लेखी परीक्षेबाबत...

महाराष्ट्र पोलीस शिपाई भरती - २०२१ च्या अनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाच्या २११ रिक्त पदांच्या जागेसाठी लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या एकूण २४१० उमेदवारांची लेखी परीक्षा **दि.०२/०४/२०२३ रोजी सकाळी ०८.३० वाजता १) सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, मोरेकुरण रोड, पालघर पश्चिम ता. जि. पालघर २) श्री. स. तु. कदम विद्यालय, बोईसर-पालघर रोड, पालघर पश्चिम, ता.जि. पालघर व ३) ट्विंकल स्टार इंग्लीश मेडीयम हायस्कुल, माहिम-मनोर रोड, पेट्रोलपंप जवळ, पालघर पश्चिम, ता. जि. पालघर** येथे घेण्यात येणार आहे. पोलीस शिपाई पदासाठी लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे **महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पध्दतीने** डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहे. सदर परीक्षा केंद्रावर उमेदवारांनी ०२ (दोन) तास अगोदर पोहोचणे आवश्यक आहे. यासंदर्भात उमेदवारांना काही अडचण / समस्या असल्यास त्यांनी पोलीस उप अधीक्षक (गृह), पालघर यांचेशी ७०२०३५२००४ तसेच नियंत्रण कक्ष पालघर येथील हेल्पलाईन क्रमांक ०२५२५-२०५३००/ ९७३०७११११९/ ९७३०८११११९/ ८६६९६०४१०० या क्रमांकावर संपर्क साधावा.

## उमेदवारांसाठी सुचना

१) उमेदवारांनी परीक्षेसाठी त्यांचे सोबत स्वत:चे प्रवेशपत्र (Admit Card) , आधार कार्ड, पॅन कार्ड घेऊन यावे. त्याशिवाय प्रवेश मिळणार नाही. तसेच ०२ कलर फोटो, काळा बॉलपेन घेऊन यावे.

२) उमेदवारांनी परीक्षा केंद्रात सोबत कोणतेही साहित्य घेऊन येवू नये. उदा. मोबाईल, बॅग, पिशवी, डिजीटल घड्याळ, कॅलक्युलेटर, ब्ल्युटुथ, हेडफोन, इलेक्ट्रॉनीक उपकरणे, पुस्तके इ. कोणत्याही वस्तु सोबत आणल्यास त्या ठेवण्यासाठी कोणतीही व्यवस्था परीक्षेचे ठिकाणी या कार्यालयाचे वतीने करण्यात आलेली नाही.

३) उमेदवारांनी वर नमुद दिलेल्या तारखेस वेळेच्या ०२ तास अगोदर परीक्षा ठिकाणी हजर राहणे अनिवार्य आहे.

४) सदरची भरती प्रक्रीया पारदर्शक, तटस्थपणे, निपक्षपातीपणे होणार आहे. करीता उमेदवाराने कोणत्याही भुल-थापास अथवा आमिषास बळी पडू नये. असे काही आढळल्यास त्याची माहिती पोलीस अधीक्षक, पालघर व पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग, पालघर यांचे तात्काळ निदर्शनास आणुन देण्यात यावे.